प्रेसनोट दिनांक ०४/०७/२०१९

## दत्तवाडी पोलीस स्टेशन,पुणे शहर.

## बायकोच्या चारित्र्यावर संशय घेवुन तिच्यावर हल्ला करणाऱ्या नवऱ्याला दत्तवाडी पोलीसांनी केले २४ तासात अटक

नुकत्याच जन्म दिलेल्या स्वतःच्या बाळाला घेवुन वहिनी बरोबर दवाखान्यात गेलेल्या पत्नी वर चारित्र्याचा संशय घेवुन तिला मारहाण करुन जखमी करणाऱ्या पतीला दत्तवाडी पोलीसांनी केले अटक.

जनता वसाहत मध्ये राहणाऱ्या एका महिलेचा विवाह शिवराज लक्ष्मण थोरातटवय २७ वर्षे राहणार एलवाडी देहुगाव पुणे यांच्या बरोबर झाला आहे. त्या काही दिवसांपुर्वी आपल्या वडिलांच्या जनता वसाहत मधील घरी आल्या होत्या. दिनांक २ जुन २०१९ रोजी दुपारी ०२/३० वा.च्या सुमारास त्या आपल्या वहिनी बरोबर एका हॉस्पीटल मध्ये उपचारासाठी गेल्या होत्या. त्याघरी परत आल्या असता त्यांचे पती शिवराज थोरात हे घराच्या बाहेर येवुन उभे राहिले व त्यांना बाहेर बोलावुन त्यांच्याशी वाद घालु लागले, शिवीगाळ करु लागले. त्या महिलेने आपल्या पतीला सांगितले की, आपण आपल्या घरी जावुन एकमेकांशी बोलु, परंतु तो काही ऐकण्याच्या मनस्थिती मध्ये नव्हता तु एवढी नटुन-थटुन पंजाबी ड्रेस घालुन कोणाला भेटायला गेली होतीस असे बोलुन त्याने आपल्या पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेवुन स्वतःच्या शर्टच्या आतील बाजुस लपवुन ठेवलेले धारदार शस्त्र बाहेर काढुन त्याने आपल्या पत्नीच्या डोक्यात कानाजवळ मारुन तीस जखमी केले. तसेच तिला वाचवण्यासाठी तीची वहिणी आली असता त्यांच्या उजव्या हातावर वार करुन जखमी केले व तो तेथुन पळुन गेला.

जखमी यांना उपचारासाठी खाजगी दवाखान्यात नेण्यात आले आहे व त्या महिलेने तिच्या पती विरुद्ध दत्तवाडी पोलीस स्टेशन येथे तक्रार नोंदविली असता लागलीच तिच्या पतीच्या शोधा साठी देविदास घेवारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार केंचे यांची तपास टिम तयार करुन त्याचा शोध घेतला व त्यास २४ तासाच्या आत अटक करण्यात पोलीसांना यश आले. त्याला तात्काळ अटक करुन न्यायालया समक्ष हजर केले व सरकारी अभियोक्ता सुरेखा क्षिरसागर यांनी त्यांच्या पोलीस कस्टडीची मागणी केली असता त्यास तीन दिवसांची पोलीस कस्टडी रिमांड मंजुर करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक नंदकुमार केंचे हे करत आहेत.

हया तपास कार्यात वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे, यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार तानाजी निकम, सुधीर घोटकुले यांनी सहभाग घेतला आहे.

**(देविदासघेवारे)**
वरिष्ठ पोलीसनिरीक्षक
दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर.